समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे

---

**दि. १५/१०/२०१८**

## <u>ग्रंथालय अहवाल (२०१८-१९)</u>

## <u>Library Staff Exchange Programe</u>

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (प्र.ल.) ता. जि. धुळे येथील ग्रंथालयातील ग्रंथपाल गजेंद्र जगदेव व ग्रंथालय सहाय्यक श्री. सुभाष बागुल हे दोन कर्मचारी समाजकार्य महाविद्यालय निर्मला निकेतन, मुंबई येथील ग्रंथालयाच्या कामकाजाचे स्वरुप जाणून घेण्यासाठी दिनांक १२ व १३ ऑक्टोबर २०१८ रोजी दोन दिवस ग्रंथालय भेटीसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा सदर उपक्रमासंबंधी अभिप्राय पुढीलप्रमाणे दिनांक १२ व १३ रोजी ग्रंथपाल व ग्रंथापाल कर्मचारी हे समाजकार्य महाविद्यालय मुंबई येथे दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ठिक ७:०० वाजता पोहचले. तेथील फादर व प्रिन्सिपॉल मॅडम यांच्याशी संपर्क करुन स्वतंत्र खोलीत प्रवेश केला. ती खोली दोन दिवसांसाठी आम्हा दोघांकरीता दोन दिवसासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती.

सकाळी ठिक ९:३० वाजता महाविद्यालयात प्रत्यक्ष ग्रंथालयाचे कामकाज पाहण्यासाठी मी स्वतः ग्रंथपाल व सुभाष बागुल सर आम्ही दोघजण पोहचलो. सुरुवातीला आमची ओळख करुन दिली. त्यानंतर तेथील ग्रंथपाल प्रविण गवळी ग्रंथालय कर्मचारी सुलभा कुलकर्णी मॅडम, प्रल्हाद आडे, अशोक तराळकर आणि संतोष फडके यांच्याशी ओळख परिचय झाला. तेथील ग्रंथालयातील ग्रंथाची मांडणी, ग्रंथाची रचना, स्वतंत्र नियतकालिक कक्ष, संशोधन प्रकल्पाचे स्वतंत्र कक्ष यांची माहिती सुलभा कुलकर्णी यांनी करुन दिली. तसेच पीएच.डी. विद्यार्थी यांच्यासाठी स्वतंत्र संगणक कक्षाबद्दल माहिती दिली. त्यानंतर संगणकातील ग्रंथाच्या नोंदी, पुस्तक देवाण-घेवाण ऑनलाईन पध्दतीने करण्या संदर्भात माहिती दिली. श्री. प्रल्हाद आढे यांनी नियतकालिकांच्या नोंदी, Indexing या संदर्भात स्लिम सॉफ्टवेअर मध्ये नोंदी संदर्भात प्रात्याक्षिक करुन दाखविले. तसेच मा. ग्रंथपाल प्रविणगवळी सर यांनी आम्हाला प्राचार्यांची भेट घालुन दिली. त्यानंतर कार्यालय अधिक्षिका यांची भेट घालुन दिली. तेथील

प्राचार्यांनी आमचे स्वागत केले. तसेच मा.डॉ.जालींदर अडसुळे सर यांचे कौतुक केले की असे उपक्रम हे राबविणे आवश्यक आहे असे सांगितले. बायोगॅस हा उपक्रम तेथील महाविद्यालयाने राबविण्याबाबत उद्घाटन कार्यक्रमाच्या उपस्थितीला रहा असे प्राचार्यांनी सांगितले होते. त्यानूसार सदर कार्यक्रमासाठी दोघे उपस्थित होतो.

दि. १३/१०/२०१८ रोजी ठिक ९:३० वाजता आम्ही पुन्हा ग्रंथालयात गेलो. पुन्हा नव्याने आम्हाला संपुर्ण ग्रंथलयाबद्दल मा. ग्रंथपाल यांनी ग्रंथाची मांडणी दाखवली. त्यानंतर सॉफ्टेअर बद्दल माहिती सांगितली. त्यामध्ये कशा नोंदी केल्या जातात आणि त्यांचे रिपोर्ट कसे काढतात या संदर्भात माहिती दिली. तसेच NAAC रिपोर्ट देखील त्यांनी दाखवले. ग्रंथ खरेदी संदर्भात ऑनलाईन ऑर्डर देण्याबाबत मार्गदर्शन केले. फाईल्सच्या रेकॉर्ड संबंधी माहिती दिली. तेथील प्राचार्या डॉ. लिडवीन डियास मॅडम, कार्यालय अधिक्षिका, ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचारी यांनी आम्हाल संपूर्ण ग्रंथालया संबंधी अद्यावत मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाच्या आपल्या ग्रंथालयात निश्चितच वापर होईल यात शंका नाही. ग्रंथालयाच्या विकासासाठी आम्ही सदैव तत्पर राहू.

लायब्ररी स्टाफ एक्सचेंज उपक्रमांमुळे आपल्या सुधारणा करण्यास फारच उपयुक्त ठरेल असे उपक्रम होणे फारच हिताचे आहे. पुन्हा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम निश्चितच चांगला झाला आहे. आम्ही दोघे जण मन:पुर्वक त्यांचे आभारी आहोत. तसेच प्राचार्या डॉ. लिडवीन डियास मॅडम यांनी आमची राहण्याची व्यवस्था विनामुल्य करुन दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.भविष्यात इतर समाजकार्य महाविद्यालयाच्या भेटीसाठी पाठवतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. सदरचा दोन्ही दिवसाचा अहवाल दिला असे.

धन्यवाद!

| | |
|---|---|
| **ग्रंथालय सहाय्यक** | **ग्रंथपाल** |
| **श्री. सुभाष बागुल** | **प्रा. गजेंद्र जगदेव** |

ग्रंथपाल प्रविण गवळी ग्रंथालय कर्मचारी प्रल्हाद आडे, अशोक तराळकर **ग्रंथपाल गजेंद्र जगदेव श्री. सुभाष बागुल**
आणि संतोष फडके





ग्रंथपाल प्रविण गवळी ग्रंथालय कर्मचारी प्रल्हाद आडे, अशोक तराळकर  आणि संतोष फडके



